Lakshya – Vidhit Gujarathi - Chess Player

# क्रीडा



• Posted at Market yard PSO Pune Daily. • आर.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०१५-२०१७.

# विदीत आठवा ; आनंद सोळावा

## जागतिक जलद बुद्धिबळ

पुणे, ता. २९ : नाशिकचा ग्रँडमास्टर विदीत गुजराथी याने जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धेत आठवा क्रमांक मिळविला. मातब्बर दिग्गज विश्वनाथन आनंद नऊ गुणांसह सोळावा आला.

कतारमधील दोहा शहरात ही स्पर्धा पार पडली. विदीतचे मानांकन १०६ स्पर्धकांत ५१वे होते. आनंद सातवा मानांकित होता. या स्पर्धेत मॅग्नस कार्लसन, हिकारू नाकामुरा, सर्जी कर्जाकीन यांच्यासह जगभरातील प्रमुख स्पर्धकांनी भाग घेतला होता. अशावेळी विदीतची कामगिरी लक्षवेधी ठरली. त्याचे एलो रेटिंग २६४७ आहे. त्याने २८१९ एलो रेटिंगच्या तोडीची कामगिरी केली. त्याने १५ फेऱ्यांत ९.५ गुण मिळविले. त्याने एकूण ७५ एलो रेटिंगची कमाई केली. सरस एलो रेटिंग असलेल्या सात प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. मुख्य म्हणजे त्याने कर्जाकिनशी पांढऱ्या मोहऱ्यांसह बरोबरी साधली. लेव्हॉन अरोनियन यालाही त्याने पांढऱ्या मोहऱ्यांसह रोखले.



विदीत गुजराथी

या स्पर्धेत वॅसिली इव्हानचुक, अलेक्झांडर ग्रिशुक, मॅग्नस कार्लसन या तिघांचे प्रत्येकी ११ गुण झाले. टायब्रेकमध्ये इव्हानचुक विजेता ठरला. ग्रिशुक दुसरा, तर कार्लसन तिसरा आला.

महिलांच्या स्पर्धेत युक्रेनची ॲना मॅझीचूक (९.५) विजेती ठरली. भारताची कोनेरू हम्पी (७) दहावी, द्रोणावल्ली हरिका (६.५) सोळावी आली.

फेरीगणिक विदीतची कामगिरी : १) - आर्यन घोलामी (इराण २१०६) - पांढऱ्या मोहऱ्यांसह विजय, २) बादूर जोबावा (जॉर्जिया २७१०) - काळ्या मोहऱ्यांसह विजय, ३) व्लादिस्लाव आर्टेमिएव (रशिया २७२३) - पांढऱ्या मोहऱ्यांसह विजय, ४) वॅसिली इव्हानचूक (युक्रेन २७७१) - काळ्या मोहऱ्यांसह पराभूत, ५) व्लादिमीर अकोपियन (आर्मेनिया २६४८) - पांढऱ्या मोहऱ्यांसह विजय, ६) अलेक्झांडर ग्रिशुक (रशिया २७६७) - काळ्या मोहऱ्यांसह पराभूत, ७) सर्जी कर्जाकिन (रशिया २८०६) - पांढऱ्या मोहऱ्यांसह बरोबरी, ८) रॅडोस्लाव वोग्ताझेक (पोलंड २७२१) - काळ्या मोहऱ्यांसह विजय, ९) इव्हान चेपारीनोव (बल्गेरिया २६९९) - पांढऱ्या मोहऱ्यांसह बरोबरी, १०) मॅक्झीम वॅचियर-लग्रेव (फ्रान्स २७९५) - काळ्या मोहऱ्यांसह विजय, ११) लेव्हॉन अरोनियन (आर्मेनिया २७७०) - पांढऱ्या मोहऱ्यांसह बरोबरी, १२) मॅग्नस कार्लसन (नॉर्वे २९०६) - काळ्या मोहऱ्यांसह पराभूत, १३) ह्रँट मेल्कुमियन (आर्मेनिया २७३६) - पांढऱ्या मोहऱ्यांसह पराभूत, १४) व्लादिमीर ओनीश्चूक (युक्रेन २७२०) - पांढऱ्या मोहऱ्यांसह विजय, १५) तैमूर रैद्जाबोव (अझरबैजान २७८८) - काळ्या मोहऱ्यांसह विजय.

### ब्लीट्झमध्ये आनंदशी बरोबरी

दरम्यान, जागतिक ब्लीट्झ स्पर्धेत विदीतने तिसऱ्या फेरीत विश्वनाथन आनंदला काळ्या मोहऱ्यांसह, तर चौथ्या फेरीत हिकारू नाकामुराला पांढऱ्या मोहऱ्यांसह बरोबरीत रोखले. २१ पैकी ११ फेऱ्या पार पडल्या आहेत. सर्जी कर्जाकीन (९.५) आघाडीवर, तर मॅग्नस कार्लसन (९) दुसरा आहे. आनंद (७) संयुक्त पाचवा व एकूण १४ वा आहे. विदीतचे ४.५ गुण आहेत.